प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

दि. १८.०२.२०२०

# सिडकोच्या मालमत्ता हस्तांतरणविषयक सेवेची माहिती देणारी ‘ट्रान्सफर मेड इझी’ पुस्तिका ऑनलाइन नि:शुल्क उपलब्ध

सिडकोच्या वसाहत विभागातर्फे देण्यात येणाऱ्या विविध सेवा या नोव्हेंबर, २०१९ पासून पूर्णत: ऑनलाइन करण्यात आल्यापासून हस्तांतरणविषयक सेवेची माहिती देणारी ‘ट्रान्सफर मेड इझी’ ही पुस्तिकाही आता ऑनलाइन व कोणतेही शुल्क न आकारता अर्जदारांकरिता सिडकोच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

नवी मुंबईतील नागरिकांना वसाहत विभागातर्फे देण्यात येणाऱ्या विविध सेवा जसे, वारस/मालमत्ता हस्तांतरण, तारण ना-हरकत प्रमाणपत्र, विविध प्रकारच्या परवानग्या, इ. या अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक रीतीने मिळाव्यात व नागरिकांना त्यासाठी वारंवार सिडको कार्यालयामध्ये येण्याची आवश्यकता भासू नये या उद्देशाने दि. १ नोव्हेंबर, २०१९ पासून या सेवा पूर्णत: ऑनलाइन डिजिटल माध्यमातून देण्याचा निर्णय सिडको महामंडळातर्फे घेण्यात आला आहे. तसेच या सेवांशी संबंधित अर्ज करणे, शुल्क भरणे, कागदपत्रे सादर करणे, नागरिकांना प्रमाणपत्रे, परवानग्या, आदेश पाठवणे या प्रक्रियाही ऑनलाइन करण्यात आल्या आहेत. ऑनलाइन सेवा सुरू केल्यानंतरही योग्य माहिती अभावी नागरिकांना अडचणी येऊ नयेत याकरिता हस्तातंरणविषयक सेवेची माहिती देणाऱ्या या योजना पुस्तिकेची विक्री (रोख रु. ५३/- या किंमतीस) सिडकोने चालू ठेवली होती.

ऑनलाइन सेवांना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभत असल्याने सिडकोने ‘ट्रान्सफर मेड इझी’ या पुस्तिकेची विक्री थांबविण्याचा निर्णय घेत ही पुस्तिका सिडकोच्या https://cidco.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर पूर्णपणे नि:शुल्क उपलब्ध करून दिली आहे. यामुळे नागरिकांना छापील पुस्तिका विकत घेण्यासाठी सिडको कार्यालयात येण्याची व या पुस्तिकेसाठी कोणेतही शुल्क भरण्याची आवश्यकता राहिलेली नाही. तसेच सदर संकेतस्थळावरून अर्ज व संलग्न प्रपत्रे डाऊनलोड करून नागरिक ऑनलाइन अर्ज भरू शकणार आहेत.

तरी यापुढे सदनिका/वाणिज्यिक गाळे/कार्यालये/भूखंड यांच्या हस्तांतरण प्रक्रियेबाबत माहिती घेण्यासाठी सदर पुस्तिका विकत घेण्याची आवश्यकता असणार नाही याची अर्जदार नागरिकांनी नोंद घ्यावी.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**